**क्र. मु.मा.आ./नों.क्र. २००८२८/२०/अ.क्र. ६०२/२३**

**अपिलार्थी, श्री. धनंजय विश्वनाथ पवार**

**श्री. दिलीप मुकूंद पाटील**

**सुनावणी दिनांक : १०.११.२०२३ (In continuation of order dt. 18.08.2023)**

दि. १०.०८.२०२३ रोजीच्या सुनावणी वेळी अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी कोणतीही सुचना न देता अनुपस्थित होते. या कारणास्तव पुढील सुनावणी आज म्हणजेच दि. १०.११.२०२३ रोजी ठेवण्यात आली आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी प्रथम अपीलीय अधिकारी कोणतीही सूचना न देता अनुपस्थित आहे. तर जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित आहे.

अपीलार्थी यांनी असे सादर केले की, त्यांना माहिती प्राप्त झाली नाही.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर असे निदर्शनास येत आहे की, या प्रकरणी अपीलार्थी यांनी मालमत्तेवर लावण्यात आलेले नावा संबंधीतचे कागदपत्रांची मागणी केली आहे. कागदपत्र सन-१९६१ च्या कालावधीतील आहे व हे कागदपत्र आता उपलब्ध नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सादर केले आहे. जन माहिती अधिकारी यांचे उत्तर अपीलार्थी यांना प्राप्त झाले आहे.

कागदपत्र उपलब्ध न होण्याचे कारण जन माहिती अधिकारी यांना विचारल्यावर त्यांनी असे सादर केले की, ज्या प्रकारच्या अभिलेखाची मागणी करण्यात आलेली आहे त्याचे जतन करण्याचा कालावधी पाच वर्षे आहे.

अपीलार्थी यांनी संबंधित परिपत्रकाची मागणी केली.

सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१. जन माहिती अधिकारी यांनी संबंधित परिपत्रकाची प्रत अपीलार्थी यांना ७ दिवसात उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२. अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

**मुंबई**
**दिनांक : २३.११.२०२३**

**(सुनील पोरवाल)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**